M. S. Board Of Secondary And Higher Secondary Education, Mumbai Divisional Board, Vashi, Navi Mumbai-400 703.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, वाशी, नवी मुंबई-४०० ७०३.

परिपत्रक क.मुविमं/लेखा १व २/नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण अंकाचे शुल्क २०२४–२०२५/1068

विषय सन २०२४–२०२५ या शैक्षणिक वर्षाचे नोंदणी शुल्क भरणे बाबत. दिनांक - 22/08/2024

प्रति
मुख्याध्यापक/प्राचार्य,
मुंबई विभागीय मंडळ कार्यालयाचे कार्यक्षेतील
सर्व मान्यताप्राप्त शाळा व कनिष्ठ महाविद्यालय

मुंबई विभागीय मंडळातील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की,सन २०२४–२०२५ या शैक्षणिक वर्षाचे नोंदणी शुल्क मंडळ नियमावलीतील नियम क्रमांक ४७ (१२) व १४ (१२) अन्वये व फेब्रुवारी–मार्च २०२४ मधील माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेकरिता नोंदणी केलेल्या नियमित विद्यार्थी संख्येनुसार नोंदणी शुल्क तसेच शिक्षण संक्रमण अंकाचे शुल्क जमा करणे अनिवार्य आहे.

तरी सर्व मान्यताप्राप्त **माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख यांनी शुल्काची रक्कम चलनाव्दारे (बँक ऑफ इंडिया च्या शाखेचे इ.१०वी साठी चलन रिसिट कोड क.५ नोंदणी शुल्क व कोड क.१२ शिक्षण संक्रमण इ.१० खाते क.008910210000028 व इ.१२ वी साठी चलन रिसिट कोड क.५५ नोंदणी शुल्क व कोड क.६२ शिक्षण संक्रमण इ.१२ खाते क.008910210000029)** खालील प्रमाणे विहीत केलेल्या मुदतीमध्ये जमा करुन त्याबाबतची चलनाची प्रत पत्रासह मंडळ कार्यालयात विहीत दिनांकास जमा करावी. उपरोक्त शुल्क **कोणत्याही परिस्थितीत डी.डी. किंवा NEFT/RTGS/PHONE PAY/G PAY व्दारे रक्कम भरणा करण्यात येऊ नये.**

नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्काचा तक्ता खालील प्रमाणे	इ. १० वी करीता	इ.१२ वी करीता
अ) विद्यार्थी संख्या (इ.१२/इ.१० वी) फेब्रुवारी–मार्च २०२४		
१. १ ते १०० विद्यार्थी	रु.१०००/–	रु.१०००/–
२. १०१ ते पुढील प्रत्येक १०० विद्यार्थीमागे	रु.२०० –	रु.४००/–
३. शिक्षण संक्रमण अंकाचे शुल्क	रु.५००/–	रु.५००/–
ब) ११ ऑगस्ट २०२४ पासून भरावयाच्या दंडाची रक्कम खालील प्रमाणे		
१ ११ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत	रु.२००/–	रु.२००/– प्रमाणे दंड
२. १ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत	रु.३००/–	रु.३००/– प्रमाणे दंड
३. १ ऑक्टोबर २०२४ नंतर नियमित विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र सादर करण्याच्या तारखेपर्यंत	रु.५००/–	रु.५००/– प्रमाणे दंड

क) मंडळाकडे शुल्क/चलनाची प्रत पत्रासह जमा करण्याच्या तारखा खालील प्रमाणे

१) ०१/०८/२०२४	जिल्हा ३२ पश्चिम मुंबई
२) ०२/०८/२०२४	जिल्हा ३१ दक्षिण मुंबई
३) ०५/०८/२०२४	जिल्हा ३३ उत्तर मुंबई
४) ०६/०८/२०२४	जिल्हा ठाणे १६.०१ ते १६.०५ व १६.१६ ते १६.१९
५) ०७/०८/२०२४	जिल्हा ठाणे १६.१४ ते १६.१५
६) ०८/०८/२०२४	जिल्हा रायगड १७
७) ०९/०८/२०२४	जिल्हा पालघर १८

तसेच नोंदणी शुल्क,विलंब शुल्क किंवा शिक्षण संक्रमण शुल्क वर्गणी मध्ये काही बदल झाल्याम त्याबाबत मंडळाकडून कळविण्यात येईल.२०२३–२०२४ या वर्षाचे नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण अंकाचे शुल्काची रक्कम भरणा केली नसल्याम तात्काळ दंडासह उपरोक्त कार्यपध्दतीनुसार भरणा करण्यात यावी.अन्यथा मंडळ नियमावली नुसार दंडात्मक कारवाई करण्यात यईल यानी नोट घ्यावी.

(डॉ.सुभाष बोरसे)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, वाशी, नवी मुंबई ४०० ७०३.